महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०२ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २१७ ■ किंमत - ०२ रुपये



### केंद्रीय अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर विविध नेत्यांनी आपले सकारात्मक आणि टीकात्मक अभिप्राय व्यक्त केले आहेत



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हा अर्थसंकल्प 'विकसित भारत'च्या दिशेने ठोस पाऊल असून, पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा, उद्योग आणि रोजगारनिर्मितीला चालना देईल. महाराष्ट्रासाठी गुंतवणूक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीने हा अर्थसंकल्प महत्त्वाचा ठरेल.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले की, हा अर्थसंकल्प सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करणारा आहे. गरीब, मध्यमवर्ग, युवक आणि महिलांच्या सशक्तीकरणावर विशेष भर देण्यात आला असून देशाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल.



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या की, हा अर्थसंकल्प समावेशक विकासाचा रोडमॅप असून आर्थिक शिस्त राखत पायाभूत सुविधा, विकासकामे आणि आत्मनिर्भर भारताला बळ देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.



राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावर टीका करत सांगितले की, हा फक्त उद्योगपतींसाठी आहे; सामान्य जनता, शेतकरी आणि बेरोजगार युवकांसाठी अपेक्षित उपाय दिसत नाहीत.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, रेल्वे, मेट्रो आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे महाराष्ट्राच्या विकासाला गती मिळेल. हा अर्थसंकल्प राज्यासाठी सकारात्मक ठरेल.

# देशाला 'दिशा, गती, निधी देणारा अर्थसंकल्प'

## केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केला विकसित भारताकडे जाणारा अर्थसंकल्प



**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज, 1 फेब्रुवारी रोजी 2026-27 या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सादर केला. आपल्या 9 व्या अर्थसंकल्पीय भाषणात त्यांनी समाजातील विविध घटकांना न्याय देण्यासाठी 11 महत्त्वाकांक्षी योजनांचा आराखडा मांडला आहे. यामध्ये ग्रामीण उद्योजकता, प्रगत तंत्रज्ञान आणि सामाजिक कल्याणावर विशेष भर देण्यात आला आहे. यंदा सादर झालेल्या अर्थसंकल्पानुसार अधिक भर पायाभूत सुविधांवर दिला असून, सरकारनं या सुविधा पुरवणाऱ्या इंफ्रा कंपन्यांना पाठबळ देण्यासाठी इंफ्रा रिस्क फंड बनवण्याची घोषणा केली. याशिवाय 5 लाखांहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांच्या मूळ आराखड्याला दुजोरा देण्यासाठीची धोरणं आखण्यात येतील असंही अर्थमंत्र्यांनी घोषित केलं. ज्यामुळं देशातील अनेक शहरांना अर्थसंकल्पातील या तरतुदीचा थेट फायदा होऊन त्यांचा आणखी झपाट्यानं विकास होताना दिसणार आहे. यंदाच्या वर्षी पायाभूत सुविधांच्या श्रेणीत कार्बन कॅप्चर योजनेसाठी 5 वर्षांत ~20,000 कोटी रुपयांची तरतूद. 7 हाय-स्पीड रेल कॉरिडोर उभारले जाणार. शिवाय बँकिंग क्षेत्राची बॅलन्स शीट मजबूत करत बँकिंग रिफॉर्म्ससाठी उच्चस्तरीय समिती स्थापन होणार. लिक्विडिटी सपोर्टसाठी ट्रान्झॅक्शन सेटलमेंट प्रोग्रामचीही अर्थमंत्र्यांकडून घोषणा झाली आहे.**

देशभरात सात नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर बांधले जातील, अशी घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी रविवारी केली. अर्थमंत्र्यांनी सांगितले की यामुळे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्रांमधील संपर्क वाढेल. अर्थसंकल्पात देशभरातील अनेक शहरांना हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरने जोडण्याची योजना देखील समाविष्ट आहे. त्याचा उद्देश प्रमुख महानगरीय क्षेत्रांना औद्योगिक आणि धार्मिक केंद्रांशी जोडणे आहे. मुंबईकरांसाठी आणि पुणेकरांसाठी ही लॉटरी असल्याच म्हटलं जात आहे.

**1. लखपती दीदी योजना**

**महिलांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या लखपती दीदी योजनेचा विस्तार करण्याची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, महिलांना केवळ उपजीविका मिळवण्यापुरते मर्यादित ठेवले जाणार नाही तर त्यांना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी चांगल्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. लखपती दीदींचे उत्पन्न आणि उद्योजकता वाढविण्यासाठी देशभरात SHE मार्ट्स (स्वयं-सहायता उद्योजक) स्थापन केले जातील.**

**2. महात्मा गांधी ग्राम स्वराज योजना**

खादी, हातमाग आणि हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी महात्मा गांधी स्वराज उपक्रम योजना सुरू केली जाईल.

**3. राष्ट्रीय हातमाग आणि हस्तकला योजना**

राष्ट्रीय हातमाग आणि हस्तकला योजनेअंतर्गत, विद्यमान सरकारी योजना एकत्रित केल्या जातील. विणकर आणि हस्तकला यांना विशेष मदत दिली जाईल.

*********

**4. राष्ट्रीय फायबर योजना**

वस्त्रोद्योग सुधारण्यासाठी, नैसर्गिक, मानवनिर्मित आणि नवीन काळातील तंतूंमध्ये स्वयंपूर्णता प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय फायबर योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेचा फायदा रेशीम आणि तागाच्या तंतूंना होईल.

**5. वस्त्रोद्योग विस्तार आणि रोजगार योजना**

या योजनेअंतर्गत, वस्त्रोद्योगाला पाठिंबा आणि अपग्रेड केले जाईल. सरकार गुंतवणुकीला पाठिंबा देईल. सामान्य चाचणी आणि प्रमाणन केंद्रे देखील स्थापन केली जातील.

**■ मुंबई-पुणे हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर**

अर्थमंत्र्यांनी देशात ७ नवे हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर प्रस्तावित केले आहेत. यामध्ये मुंबई-पुणे दरम्यान समर्पित हाय-स्पीड ट्रॅक बांधला जाईल. यामुळे या दोन शहरांमधील प्रवासाचा वेळ ९० मिनिटांपेक्षाही कमी होणार आहे.

**■ पुणे-हैदराबाद हाय-स्पीड लिंक**

पुण्यातील आयटी आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्राला दक्षिण भारताशी जोडण्यासाठी पुणे-हैदराबाद हाय-स्पीड कॉरिडॉर सुरू केला जाणार आहे. यामुळे सोलापूर आणि आजूबाजूच्या औद्योगिक क्षेत्राला मोठी चालना मिळेल.

**मुंबई मेट्रो विस्तारीकरण**

मुंबई महानगर क्षेत्रासाठी (MMR) केंद्राने मेट्रो प्रकल्पांना गती देण्यासाठी विशेष निधीची तरतूद केली आहे. यात प्रामुख्याने मेट्रो लाईन ४ (वडाळा-कासारवडवली) आणि मेट्रो लाईन ५ (ठाणे-कल्याण) च्या कामांना वेग दिला जाईल.

**■ ठाणे-बोरीवली अंडरग्राउंड टनेल**

मुंबईतील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ठाणे-बोरीवली भुयारी मार्गासाठी केंद्राने राज्याला सहकार्य आणि निधी देण्याचे मान्य केले आहे. या प्रकल्पामुळे घोडबंदर रोडवरील वाहतुकीचा ताण कमी होईल.

**■ सिटी इकॉनॉमिक रिजन**

मुंबई आणि पुण्याला 'सिटी इकॉनॉमिक रिजन' म्हणून विकसित करण्यासाठी विशेष पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. याअंतर्गत शहरांमधील पायाभूत सुविधांचे नियोजन थेट आर्थिक विकासाशी अर्थात मुंबई-पुण्यातील IT हब आणि फिनटेकशी जोडले जाईल.

**■ सेमीकंडक्टर मिशन २.०**

पुण्यातील चाकण आणि तळेगाव या औद्योगिक पट्ट्यासाठी ही सर्वात मोठी घोषणा आहे. ४०,००० कोटी रुपयांच्या या मिशनमुळे पुण्यातील इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल उद्योगांना मोठा फायदा होणार असून रोजगाराच्या लाखो संधी उपलब्ध होतील.

**■ कोस्टल कनेक्टिव्हिटी आणि वॉटरवेज**

मुंबईच्या पश्चिम किनारपट्टीवर जलवाहतूक (Waterways) वाढवण्यासाठी आणि प्रलंबित असलेल्या काही कोस्टल रोड कनेक्टिव्हिटी प्रकल्पांना 'पीएम गतिशक्ती' अंतर्गत प्राधान्य देण्यात आले आहे.

## महापौरपदाची सूत्रे स्वीकारण्यापूर्वी हर्षाली चौधरी यांनी घेतले कुंभेश्वराचे दर्शन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. ३**

**कल्याण :** कल्याण–डोंबिवली महापालिकेच्या महापौरपदी दि. ३ फेब्रुवारी रोजी विराजमान होणाऱ्या शिंदेसेनेच्या हर्षाली चौधरी यांनी पदभार स्वीकारण्यापूर्वी कुंभेश्वर देवाचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले. शनिवारी भिवंडी तालुक्यातील त्यांच्या माहेरी असलेल्या शेरे गावाजवळ, पडघा–खडवली फाट्याजवळील कुंभेश्वर मंदिरात त्यांनी दर्शन घेतले. आगामी कार्यकाळ यशस्वी होण्यासाठी त्यांनी देवाकडे प्रार्थना केली.

यावेळी प्रतिक्रिया देताना आमदार शांताराम मोरे म्हणाले की, कल्याण–डोंबिवलीसारख्या विकसित शहराच्या महापौरपदी पडघा परिसरातील महिलेला संधी मिळणे ही अभिमानाची बाब आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आशीर्वादाने हे शक्य झाले असून त्यांचे मनापासून आभार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी शिंदेसेनेचे भिवंडी ग्रामीण मतदारसंघाचे आमदार शांताराम मोरे, सरपंच सायली पाटील तसेच स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी हर्षाली चौधरी यांना महापौरपदासाठी शुभेच्छा दिल्या.

## ठाण्यात उभारलेले त्रिमंदिर एकतेचे प्रतीक – एकनाथ शिंदे

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १**

**ठाणे :** ठाणे शहरात उभारण्यात आलेल्या भव्य त्रिमंदिरामुळे शहराची आध्यात्मिक पवित्रता अधिक वाढली आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. या मंदिराच्या उभारणीसाठी योगदान देता आले, हे आपले भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

बाळकुम येथील पालिकेच्या ग्लोबल इमारत परिसरात दादा भगवान परिवार, महावीर जैन ट्रस्ट आणि ठाणे महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने धर्मवीर आनंद दिघे कर्करोग रुग्णालय आणि त्रिमंदिर उभारणीचे काम अडीच वर्षांपूर्वी हाती घेण्यात आले होते. यापैकी त्रिमंदिराचे काम पूर्ण झाले असून, दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी या कालावधीत प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्यादरम्यान रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्रिमंदिराला भेट देत उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले की, त्रिमंदिर हे भारतीय संस्कृतीतील एकतेचे प्रतीक असून, ठाण्यासह संपूर्ण विश्वाचे आध्यात्मिक केंद्र बनेल. मंदिर परिसरात विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्वतः लक्ष घालणार असल्याचा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# तर दादांनी आमच्याशी नक्कीच चर्चा केली असती

## राष्ट्रवादी विलिनीकरणाच्या चर्चांना फडणवीसांचा स्पष्ट नकार ● शरद पवारांचा दावाही खोडला

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १**

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षाच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चांना पुन्हा उधाण आले असतानाच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दाव्यांना स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले आहे. विलिनीकरणाची तारीख ठरली होती, असा शरद पवारांचा दावा फडणवीसांनी अमान्य केला आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "अशी चर्चा जर कुठल्याही अंतिम टप्प्यावर गेली असती, तर अजितदादांनी ती आमच्याशी नक्की शेअर केली असती. ते सरकारमध्ये होते. सरकारमध्ये असताना आमच्याशी चर्चा न करता असा निर्णय होऊ शकत नाही. कुठलीही तारीख ठरल्याची माहिती आम्हाला नाही."

दरम्यान, शनिवारी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या एकत्रीकरणाबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू झाले होते. मात्र, मुख्यमंत्री फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर या चर्चांना पूर्णविराम मिळाल्याचे चित्र आहे.

शरद पवार आणि अजित पवार यांच्यात नेमकी काय चर्चा झाली, याची माहिती आपल्याला नसल्याचेही फडणवीसांनी स्पष्ट करत, "आमच्यापुरते सांगायचे झाले, तर विलिनीकरणाची कोणतीही तारीख ठरलेली नव्हती," असे ठामपणे नमूद केले.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाच्या चर्चांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा स्पष्ट आणि परखड भूमिका मांडली आहे. अशा प्रकारची कोणतीही चर्चा भाजपशी बोलल्याशिवाय होऊ शकत नाही, असे ठाम मत त्यांनी व्यक्त केले. फडणवीस म्हणाले, "समजा अजित पवार अशा प्रकारच्या कुठल्याही एकत्रिकरणाची चर्चा करत असतील, तर ती चर्चा भाजपाशी चर्चा केल्याशिवाय करतील का? जर ते चर्चा करत असतील, तर त्यांनी भाजपाशी नक्कीच चर्चा केली असेल. चर्चा करायची किंवा नाही करायची, विलिनीकरण करायचं की नाही, हे शंभर टक्के राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं अधिकार क्षेत्र आहे. मात्र, कुठलाही निर्णय घेण्यापूर्वी आमच्याशी एकदा चर्चा करावी, ही आमची अपेक्षा आहे."

याचवेळी त्यांनी विलिनीकरणाच्या चर्चांमागील हेतूवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "समजा अजित पवार अशा चर्चा करत होते, तर त्या एनडीएमधून बाहेर पडण्यासाठी होत्या का? ते सरकारमधून बाहेर पडणार होते का? प्रत्यक्षात ते सरकारमध्ये पूर्णपणे स्थिर होते," असे फडणवीस म्हणाले.

दरम्यान, रोज नवे संभ्रम निर्माण करून त्याचा गाजावाजा करण्याची पद्धत अयोग्य असल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले. "रोज काहीतरी कन्फ्युजन तयार करायचं आणि आपली इकोसिस्टम वापरून ते इको करायचं, ही पद्धत योग्य नाही," असे सांगत फडणवीसांनी अप्रत्यक्षपणे विरोधकांवर निशाणा साधला.

मुख्यमंत्र्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलिनीकरणाविषयी सुरू असलेल्या चर्चांना मोठा राजकीय ब्रेक लागल्याचे मानले जात आहे.





## वाचक मनोगत

### बाल विवाह समस्येचे उच्चाटन व्हावे



बाल विवाहावर कायदेशीर बंदी असतानाही आज बाल विवाह कमी होताना दिसत नाही. दररोजच्या वर्तमानपत्रात बाल विवाह झाल्याची एखादी तरी बातमी असतेच. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि प्रगत राज्यातही बाल विवाहाचे प्रमाण लाक्षणिक आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला हे भूषणावह नाही. लॉक डाऊनमध्ये तर बालविवाहाचे प्रमाण खूप वाढले होते आता सर्व सुरळीत सुरू झाल्यानंतर तरी बाल विवाहाचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते मात्र अजूनही राज्यात बाल विवाह होत आहेत. अर्थात इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्रातील बाल विवाहाचे प्रमाण कमी आहे ही समाधानाची बाब असली तरी बाल विवाह पूर्णतः रोखण्यात महाराष्ट्र अपयशी ठरला आहे हे मान्यच करावे लागेल. महिला व बालविकास विभागाच्या ताज्या अहवालानुसार राज्यात गेल्या सात वर्षात तब्बल ६४२८ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. म्हणजेच या हजारो चिमुरड्यांना बालवयातच बोहल्यावर चढवले जाणार होते. होऊ घातलेले हे हजारो बालविवाह रोखल्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदनच करायला हवे. आकडेवारीतील ही प्रचंड वाढ प्रशासनातील सतर्कता दर्शवत असली तरी ग्रामीण भागातील बाल विवाहाची मानसिकता अद्याप बदललेली नाही हेच यातून अधोरेखित होते. मागील आठवड्यात एका पंधरा वर्षाच्या दहावीतील मुलीने तिचा होऊ घातलेला विवाह रोखण्यासाठी मुख्याध्यापकांना पत्र लिहिले होते याचाच अर्थ प्रशासनाने प्रयत्न करूनही राज्यात बालविवाह होतच आहेत. मागील वर्षी द लांसेट ग्लोब हेल्थ या शोध पत्रिकेत प्रकाशित झालेल्या अहवालात आपल्या देशातील बाल विवाहाच्या सद्य स्थितीवर बोट ठेवण्यात आले होते. या अहवालानुसार देशातील काही राज्ये तसेच केंद्र शासित प्रदेशांमध्ये २०१६ ते २०२१ या कालावधीत बाल विवाहाची कुप्रथा सामान्य बनली असल्याचा दावा केला आहे. बाल विवाहामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसल्याचेही या अहवालात म्हंटले होते याचाच अर्थ देशात आजही बालविवाह होत आहेत. राज्यातही होत आहेत. राज्याच्या विविध विभागातून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील १६ आदिवासी बहुल जिल्ह्यांमध्ये मागील चार वर्षामध्ये अल्पवयीन मातांची संख्या दहा हजारांहून अधिक आढळून आली आहे. या आदिवासी जिल्ह्यांत १८ वर्षांपेक्षा कमी वय असलेल्या गर्भवती मातांची संख्या देखील लाक्षणिक आहे. बाल विवाहाची प्रथा काही आदिवासी जमातींमध्ये पिढ्यानपिढ्या सुरू आहे. हा परंपरेचा भाग असला तरी पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आणि राज्याच्या ग्रामीण भागातही बाल विवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे हे कोणालाही नाकारता येणार नाही. आपल्या देशात मुला मुलींच्या लग्नाचे वय कायद्याने ठरवून दिले आहे. मुलांचे लग्नाचे वय २१ तर मुलींच्या लग्नाचे वय १८ असावे असे कायदा सांगतो त्यापेक्षा कमी वयात विवाह झाला तर तो बाल विवाह समजला जातो. २००६ साली केंद्र सरकारने बाल विवाह प्रतिबंधक कायदा नव्याने मंजूर केला. सरकारने मंजूर केलेल्या या कायद्यानुसार बाल विवाहास कठोर शिक्षेची तरतूद आहे. मात्र या कायद्याची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या कायद्याचा धाक राहिला नाही. बाल विवाह झालेल्या मुला मुलीला लहानपणीच संसाराचा गाढा हाकावा लागतो त्यामुळे त्यांचे बालपण हिरावले जाते. त्यांचे शिक्षण अर्धवट राहते. बाल विवाह झालेल्या मुलींना अल्पवयातच मातृत्व प्राप्त होते. त्यामुळे जन्माला येणारे बाळ देखील सशक्त नसते. बाल वयातच आई झालेल्या मुलीला देखील आरोग्याच्या समस्या निर्माण होतात त्यामुळे कुपोषणासह अनेक रोगांना त्यांना सामोरे जावे लागते. आज आपला देश सर्वच क्षेत्रात प्रगती करीत आहे. इंटरनेट, मोबाईल, आधुनिक तंत्रज्ञान यामुळे आपण जगासोबत स्पर्धा करीत आहोत. अगदी चंद्रावर देखील आपण स्वारी केली आहे. जगातील प्रगत देशात आपली गणना होऊ लागली आहे. आधुनिक शिक्षण घेऊन आपण काळासोबत पुढे जात असताना खेड्यापाड्यातील मुली बाल विवाहाला बळी पडत आहेत. ही विसंगती बदलायला हवी. त्यासाठी बाल विवाह समस्येचे मुळापासून उच्चाटन व्हायला हवे. बाल विवाह या सामाजिक समस्येचे उच्चाटन करायचे असेल तर सर्वांनाच जागृत करणे गरजेच आहे. भारतात बाल विवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, व समाजाने एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. बाल विवाह रोखण्यासाठी ग्राम पातळीवरील समित्या सक्षम करण्याची गरज आहे. लग्नासाठी वयाचे दाखले या समितीकडे जमा करून त्या समितीची लेखी परवानगी घ्यावी असा नियम केला तर बाल विवाहास काही प्रमाणात आळा बसेल. बाल विवाह होऊ नये यासाठी विविध स्तरातून जनजागृती करावी. ज्याप्रमाणे अस्पृश्यता, सतीची चाल, विधवा विवाहास बंदी, केशवपन या अनिष्ट चालीचे उच्चाटन झाले त्याप्रमाणे बाल विवाहाचे देखील उच्चाटन व्हायला हवे.



**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुण

# भिवंडीतील अंजूर ग्रामपंचायत येथील "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा" मुख्याधिकाऱ्यांकडून आढावा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील ग्रामपंचायत अंजूर गांव येथे काल शनिवार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी अचानक भेट देऊन "मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा व विकासकामांचा सखोल आढावा घेतला.या अभियानांतर्गत झालेल्या विकासकामांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समाधान करण्यात आले.

याप्रसंगी भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर, ग्रामपंचायत अधिकारी अनिल गणेश कांगणे , सरपंच छाया शाम जनाठे, उपसरपंच हरेश मुरलीधर नाईक, ग्रामपंचायत सदस्य सुकेश डाकी, अविनाश दोडे,योगिता भोईर, ग्रामपंचायत कर्मचारी तसेच मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.या भेटीदरम्यान अभियानाबाबतची सविस्तर माहिती ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिली. अभियानाचे मुख्य ७ घटक लक्षात घेऊन प्रत्येक घटकावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अभियानाच्या कालावधीत ग्रामपंचायत अंजूर येथे राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाधान व्यक्त करत विशेष कौतुक केले.

यावेळी उपस्थित ग्रामपंचायत समिती सदस्यांनी विविध नागरी व विकासात्मक समस्यांकडे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे लक्ष वेधले. स्टेम प्राधिकरण अंतर्गत मुख्य माणकोली ते अंजूर




दरम्यान जलवाहिनी असून मुख्य रस्त्यालगत असलेल्या एस.एस. अपार्टमेंटमध्ये १२७ मिळकतधारक वास्तव्यास आहेत. मात्र,अंजूर येथील पाण्याच्या टाकीतून त्यांना पाणीपुरवठा करणे शक्य नसल्याने मुख्य जलवाहिनीवरून टॅपिंग करून त्यांना पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयासमोरील जागा व घर खरेदी करण्याबाबत परवानगी देण्यात यावी, तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी सर्व्हे नं. २२३ मधील ३० गुंठे जागेचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून सदर जागा ग्रामपंचायतीला लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावी, अशा सूचना सदस्यांमार्फत करण्यात आल्या. याशिवाय ग्रामपंचायत अंजूर हद्दीतून जाणाऱ्या मुंबई–अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे गावातील मुलांसाठी असलेले एकमेव क्रिकेट मैदान बाधित झाले आहे. परिणामी आजतागायत मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नसून सर्व्हे नं. २२३ मध्ये क्रीडांगणाची तरतूद करून देण्याची मागणी ग्रामपंचायत समितीने केली.त्यावर विचार करून हा विषय मार्गी लावावा.

यावेळी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ज्या बाबींमध्ये अधिक गुण मिळू शकतात, त्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करून अभियानात जास्तीत जास्त गुण प्राप्त करण्यासाठी नियोजनबद्ध अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दिल्या. तसेच घनकचऱ्याचे योग्य प्रकारे विलगीकरण करून खतनिर्मिती करावी, सुका कचरा रिसायकलिंगसाठी पाठवावा आणि लोकसहभाग वाढविण्यासाठी शालेय आजी-माजी विद्यार्थ्यांशी संवाद साधून लोकसहभागाची चळवळ उभी करावी, असे मार्गदर्शन त्यांनी केले.यानंतर ग्रामपंचायत अंजूर येथे मंजूर झालेल्या पंचायत प्रशिक्षण केंद्राची पाहणी करण्यात आली. पंचायत प्रशिक्षण केंद्राचे सादरीकरण समाधानकारक असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नमूद केले. त्यानंतर ग्रामपंचायत हद्दीतील आरोग्य केंद्राला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली व उपस्थित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

# जीवनदीप महाविद्यालयात केंद्रीय अर्थसंकल्पाचं थेट प्रक्षेपण

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १ गोवेली**

केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या विकसित भारताच्या अर्थसंकल्प २०२६–२७ चे थेट प्रक्षेपण आज जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथे आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे यांच्यासह महाविद्यालयातील वाणिज्य, अर्थशास्त्र तसेच अकाउंट्स अँड फायनान्स विभागाच्या प्रमुख प्रा.



धनश्री चव्हाण, प्रा. मीना मुळीक, प्रा. मयुरी कांबळे, इतर प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाला दिशा देणारा हा अर्थसंकल्प असून, लोकाभिमुख निर्णय, आर्थिक शिस्त आणि 'विकसित भारत' या संकल्पनेची ठाम पायाभरणी यातून होत असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून अर्थसंकल्पाच्या थेट प्रक्षेपणाचा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

**विद्यार्थ्यांना थेट केंद्रीय अर्थसंकल्प दाखवणे म्हणजे केवळ माहिती देणे नव्हे, तर देशाची आर्थिक दिशा समजावून देण्याची संधी आहे. बजेटच्या माध्यमातून महसूल, खर्च, कररचना आणि विकासाच्या प्राधान्यक्रमांची प्रत्यक्ष ओळख विद्यार्थ्यांना होते. यामुळे पुस्तकातील अर्थशास्त्र जिवंत होत असून, जागरूक नागरिक घडण्यास आणि भविष्यातील स्पर्धा परीक्षा व करिअरसाठी त्यांची तयारी भक्कम होते.**




## संत रविदास महाराज" यांच्या जयंती निमित्त केडीएमसीतर्फे अभिवादन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** "संत रविदास महाराज" यांच्या जयंतीदिनी आज कल्याण डोंबिवली महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस महापालिका उपायुक्त प्रसाद बोरकर यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपस्थित सहा.जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार व इतर अधिकारी कर्मचारी यांनी देखील संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.



## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये संत रविदास महाराज जयंती साजरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांचे निर्देशानुसार आज संत रविदास महाराज जयंती निमित्त पालिका मुख्यालयात मा. अतिरीक्त आयुक्त, श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते संत रविदास महाराज यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी श्री. गोकुळ कदम, महासचिव, राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्र प्रदेश तसेच चर्मकार महासंघाचे पदाधिकारी व महानगरपालिकेचे इतर अधिकारी आणि कर्मचारी उपस्थीत होते.



## ३५ वर्षांनी पुन्हा भरली मित्रांची शाळा

### केईएस हंस भुग्रा मराठी माध्यम शाळेतील १९८१-१९९० या बॅचचे विद्यार्थी जमले एकत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**(कुणाल म्हात्रे)**

**कल्याण :** मैत्री ही आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर होते किंबहुना व्हायलाच हवी, शाळेतली मैत्री ती तर खुपचं खास असते मौल्यवान असते आणि ही परत मिळतं नसते आणि म्हणुनच ती कायम जपायची जोपासायची असते जशी मुंबईतल्या ह्या केईएस मराठी माध्यमातल्या माजी विद्यार्थ्यांनी गेली साडेतीन दशकं जपलीय.

३५ वर्षांनंतर मुंबईच्या सांताक्रुझ पुर्व ह्या उपनगरातील कालिना येथील केईएस हंस भुग्रा (मराठी माध्यम)शाळेतील १९८१-१९९० ह्या बॅचमधील तब्बल ३२ माजी विद्यार्थी पुन्हा एकत्र आले आणि एक सुंदर दोन दिवसीय स्नेहसोहळा नुकताचवाडा, पालघर येथे आयोजित केला होता. यामध्ये सर्वजण आपआपल्या आयुष्यात व्यस्त आहेत. कुणी डॉक्टर झालयं तर कुणी चार्टर्ड अकाऊंटंट कुणी मोठ्या कॅार्पोरेट कंपनीत काम करतय तर कुणी उद्योजक आहे कुणी शिक्षिका तर कुणी गृहिणी कुणी कोकणात आहेत तर कुणी परदेशात. पण ह्या सगळ्या विखुरलेल्या माजी विद्यार्थ्यांना २०११ मध्ये सुरु झालेला "केईएस स्कुल १९८१-१९९० बॅच" या व्हॉट्सअॅप ग्रुपने.

या स्नेहसोहळ्याला डोंबिवली, पुणे, मालवण, गडचिरोली इथुन शाळेतले माजी विद्यार्थी आले होते. ह्या स्नेह सोहळ्यासाठी खास शाळेच्या बॅचच्या लोगोचं एक छान टिशर्ट बनवण्यात आले होते आणि सर्व माजी विद्यार्थ्यांना एक सुंदर भेटवस्तु म्हणुन हे टिशर्ट, हातातील रिस्टबँड जो खास ह्या स्नेहसोहळ्यासाठी बनवलेला, अत्तर आणि हाताने लिहिलेलं ग्रिटिंगकार्ड आणि मिठाई देण्यात आलं सर्वचं विद्यार्थी एकमेकांना बघुन आनंदी आणि उत्साही होते. या स्नेहसोहळ्याच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचा सामुहीक ५०वा वाढदिवस सुध्दा औक्षण करुन आणि केक कापुन साजरा केला. आकाशात फटाक्यांच्या आतषबाजीने सगळेच भारावुन गेले.

गाण्यांची शेरोशायरीची मैफिल जमली, शाळेतल्या जुन्या गप्पा रंगल्या, एकाच बाकावरचे मित्र जेव्हा भेटले तेव्हा आपसुकचं भावनांचा बांध तुटला आणि गळाभेट झाली, खुप जुन्या आठवणींना वाट मोकळी केली, बऱ्याचं विद्यार्थ्यांनी आपलं मनोगत मांडलं. या स्नेहसोहळ्याच्या निमित्ताने सर्व माजी विद्यार्थ्यांनी दोन दिवस एकमेकांच्या सहवासात धमाल मस्ती करत आनंदात घालवले.

प्रत्येक शाळेतल्या खास करुन "मराठी माध्यमातील" शाळेतल्या विद्यार्थ्यांनी हे असे स्नेहसोहळे करत रहावे. याने आत्ताच्या नवीन पिढीला सुध्दा हे कळेल की मराठी माध्यमाच्या शाळेतून शिकलेली हे सर्व माजी विद्यार्थी आज त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात यशस्वी आहेत. शाळा हा एकमेव असा दुवा आहे जो आपण आयुष्यात कितीही मोठे झालो तरीही आपल्या सगळ्यांना घट्ट बांधुन ठेवतो आणि ३५ वर्षांनी पुन्हा असे स्नेहसोहळे घडवुन आणतो. केईएस शाळेतील १९८१-१९९० बॅचच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी तो सुंदर दुवा जिवापाड जपुन ठेवलाय.

# निवडणूक प्रचारात सहभाग : भिवंडी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)**

भिवंडी निजामपुर शहर महानगर पालिकेच्या आस्थापनेवर सेवेत कार्यरत असताना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ मध्ये निवडणुकीच्या प्रचारार्थ सहभाग घेतला असल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चार कर्मचाऱ्यांना निवडणूक विभागामार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे त्यामुळे पालिका अधिकारी व कर्मचारी वर्गात खळबळ माजली आहे. माध्यमिक शिक्षण विभागातील शिपाई साईनाथ भोईर, सार्वजनिक आरोग्य विभागातील सफाई कामगार भगवान तुकाराम साळवी, जितू डाया परमार,महानगरपालिका प्रभाग समिती १ मधील शौचालय कॅबिन क्र.२७ अ मधील सफाई कामगार महेश रावजी गोहिल अशा चार कामगारांच्या विरोधात निवडणूक विभागाकडे तक्रार आल्या आहेत. तक्रारीत नमूद केल्या नुसार या चौघांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निवडणुकीत उमेदवाराच्या प्रचारार्थ सहभाग घेतल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याचे नमूद केले असून त्याबाबत तक्रार अर्ज व अर्जासोबत जोडलेले छायाचित्र प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे नियम ५ (१) नमुद नुसार शासकीय कर्मचा-याला कोणत्याही पक्षाचा किंवा राजकारणात भाग (प्रचार प्रक्रिया) घेता येत नसतांना त्यांनी आचारसंहितेचा भंग केला असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ चे नियम ३ चे उलंघन करुन कार्यालयीन शिस्तीचा भंग केल्याप्रकरणी भिवंडी महापालिकेचे निवडणूक विभागाचे उपायुक्त विक्रम दराडे यांनी या चार कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटीस मध्ये नमूद केल्यानुसार हि बाब अनुचित व कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारी आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे नियम ३ चा भंग झाल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ५६ (२) (फ) अन्वये विभागीय चौकशी करणेकामी महानगरपालिका सेवेतुन निलंबीत कारवाई का करण्यात येवू नये? या बाबतचा खुलासा २४ तासाचे आत उपायुक्तांकडे सादर करण्याचे सांगितले आहे. अन्यथा वेळेत खुलासा प्राप्त न झाल्यास या चार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणार आहे.

या घटनेने महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ माजली आहे. मागील महानगरपालिका निवडणुकीत देखील महापालिका कर्मचाऱ्यांनी निवडणूकीतील उमेदवाराच्या प्रचारात सहभागी झाले होते. त्यावेळी देखील निवडणूक कार्यालयामार्फत केवळ नोटीस बजावण्यात आली होती.मात्र पुढे कोणतीही कारवाई न झाल्याने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. त्यामुळे अशा घटना वारंवार घडत आहेत आणि त्याचा परिणाम निवडणूक निकालावर होत आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासन व आस्थापना विभाग या बाबत कोणते निर्णय घेणार याकडे नागरिकांचे लक्ष्य लागले आहे.

## भविष्यवेध



■ सोमवार
02 फेब्रुवारी 2026

**मेष**
निर्णय घेताना भावनांवर नियंत्रण ठेवा. कामाच्या ठिकाणी प्रशंसा मिळेल. आत्मविश्वास वाढेल. महत्त्वाची कामे पूर्ण होतील. खर्च वाढण्याची शक्यता. वाद टाळल्यास दिवस चांगला जाईल.

**वृषभ**
आज कामात गती येईल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. आर्थिक व्यवहारात सावधगिरी आवश्यक. संयम ठेवल्यास यश मिळेल.

**मिथुन**
कामात अडथळे येऊ शकतात. संयम आणि मेहनतीने परिस्थिती सुधारेल. आरोग्याची काळजी घ्या. भागीदारीत लाभ संभवतो. सामाजिक सन्मान मिळेल. आर्थिक निर्णय विचारपूर्वक

**कर्क**
घ्या. स्थैर्य लाभेल. गुंतवणुकीसाठी दिवस अनुकूल नाही. संयम ठेवल्यास नातेसंबंध सुधारतील. कामानिमित्त प्रवास संभवतो. बोलण्यातून गैरसमज टाळा. मित्रांचे सहकार्य लाभदायक ठरेल.

**सिंह**
घरगुती प्रश्नांवर लक्ष द्यावे लागेल. खर्च वाढू शकतो. मानसिक शांतता राखणे आवश्यक. नेतृत्वगुणांना वाव मिळेल. अडकलेली कामे पूर्ण होतील. अहंकार टाळल्यास लाभ होईल.

**कन्या**
कार्यक्षेत्रात बदल संभवतो. आरोग्याची काळजी घ्या. मेहनतीचे योग्य फळ मिळेल. भागीदारीत सावधगिरी ठेवा. कायदेशीर बाबींमध्ये यश मिळू शकते. कौटुंबिक आनंद वाढेल. कामाचा

**तुळ**
ताण वाढेल. जबाबदाऱ्या सांभाळाव्या लागतील. संयम ठेवल्यास यश मिळेल. सर्जनशील कामात यश मिळेल. मित्रांचे सहकार्य लाभेल.
खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे. जुनी

**वृश्चिक**
रखडलेली कामे मार्गी लागतील. नवे संपर्क लाभदायक ठरतील. प्रवासाचे योग आहेत. आरोग्याकडे लक्ष द्या. बोलण्यात संयम ठेवा. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील.

**धनु**
कामाचा ताण जाणवेल. वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक स्थैर्य हळूहळू वाढेल. नवीन कल्पनांना यश मिळेल. सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. खर्चाचे नियोजन करा. भावनिक स्थैर्य आवश्यक.

**मकर**
कौटुंबिक आनंद मिळेल. मन अस्वस्थ राहू शकते. महत्त्वाचे निर्णय पुढे ढकला. नातेवाईकांकडून सहकार्य मिळेल. नवीन संधी मिळण्याची शक्यता. प्रवास यशस्वी ठरेल. आहे.

**कुंभ**
भावनिक निर्णय टाळा. आर्थिक स्थिती सुधारेल. कौटुंबिक सौख्य मिळेल. नवीन जबाबदाऱ्या मिळतील. कामात यश मिळेल. आर्थिक व्यवहारात सावध राहा. कुटुंबाकडून पाठिंबा मिळेल.

**मिन**
गुप्त शत्रूंपासून सावध रहा. आर्थिक निर्णय पुढे ढकला. संयम फायदेशीर ठरेल. शिक्षण व करिअरमध्ये प्रगती होईल. नवीन ओळखी उपयोगी पडतील. दिवस उत्साहवर्धक आहे.




# कोकण पदवीधर आमदार ॲड. निरंजन डावखरे यांची केंद्रीय अर्थसंकल्पाबद्दल प्रतिक्रिया

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा भारताच्या वेगवान विकासाला नवी दिशा देणारा आणि सर्वसमावेशक प्रगतीचा स्पष्ट आराखडा मांडणारा अर्थसंकल्प आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दूरदृष्टीतून सादर झालेला हा अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक परिवर्तनाचा मजबूत पाया घालणारा ठरेल

या अर्थसंकल्पात एफडीआयच्या माध्यमातून सेमीकंडक्टर, फार्मा, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या उच्च तंत्रज्ञान उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून युवकांसाठी नव्या संधींचे दरवाजे खुले होणार आहेत. केवळ टेक्नॉलॉजी ड्रिव्हन विकास नव्हे, तर हँडलूम क्षेत्रातील कारागीर, पारंपरिक उद्योग आणि स्थानिक उद्योजक यांनाही मुख्य प्रवाहात आणण्याचा समावेशक दृष्टिकोन या बजेटमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.

महाराष्ट्र आणि कोकण विभागासाठी करण्यात आलेल्या घोषणा विशेष महत्त्वाच्या आहेत. कोकणातील नारळ व काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया उद्योग, मार्केटिंग आणि उत्पादनवाढीवर आधारित प्रोत्साहन योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी ठरेल. भिवंडी, इचलकरंजी, पुणे आणि नाशिकसारख्या पारंपरिक औद्योगिक क्लस्टर्सच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय रोजगारनिर्मिती आणि निर्यात वाढीसाठी निर्णायक ठरेल.



मुंबई-पुणे आणि पुणे-हैदराबाद हाय-स्पीड रेल कॉरिडोरमुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक गतीला मोठी चालना मिळणार आहे. त्याचबरोबर मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (IICT) चे मुख्य केंद्र स्थापन केल्यामुळे ॲनिमेशन, गेमिंग, कॉमिक्स आणि AVGC क्षेत्रात मुंबईला जागतिक ओळख मिळणार आहे. 'ऑरेंज इकॉनॉमी' अंतर्गत १५,००० शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू होणार आहे यामुळे MMR विभागाला आणि महाराष्ट्र राज्याला देखील यामधून फायदा मिळणार आहे. याद्वारे मुंबईला या नव्या डिजिटल अर्थव्यवस्थेची राजधानी बनवण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय यामुळे अत्यंत स्वागतार्ह आहे.

आज गुरु रविदास जयंतीच्या पवित्र दिवशी सर्व समाजघटकांना सोबत घेऊन जाणारा समतेचा आणि संधींचा मार्ग दाखवणारा हा अर्थसंकल्प सादर झाल्याने त्याचे सामाजिक महत्त्व अधिक वाढते.

या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी मी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मनापासून अभिनंदन करतो तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली भारत आत्मनिर्भर, समृद्ध आणि जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करेल, असा ठाम विश्वास व्यक्त करतो.

# 'मच्छर ला टक्कर' अभियानाची ठाण्यात सुरुवात; चार चित्ररथांतून जनजागृती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
■ **प्रतिनिधी / दि. १**

**ठाणे : भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ठाणे जिल्हा आरोग्य विभागामार्फत 'मच्छर ला टक्कर' या कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक विशेष अभियानाची सुरुवात करण्यात आली. जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय व Godrej Embed FHI संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.**

जिल्हा पोलीस आयुक्तालयाच्या मैदानात उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या अभियानाचा शुभारंभ झाला. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या अभियानांतर्गत चार भव्य जनजागृती चित्ररथ ठाणे शहरात फिरविण्यात येणार असून, मलेरिया, डेंग्यू व चिकुनगुनिया यांसारख्या कीटकजन्य आजारांबाबत नागरिकांमध्ये जागृती केली जाणार आहे. डासांची उत्पत्ती रोखणे, साचलेल्या पाण्याचे व्यवस्थापन आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत माहिती दिली जाणार आहे. दरम्यान, १० ते २३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत भिवंडी तालुक्यात हत्तीरोग दुरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. संतोषी शिंदे यांनी दिली.

# दिवा स्थानकात धोकादायक प्रवास

## मध्य रेल्वेकडून उपाययोजनांची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १**

**ठाणे :** मध्य रेल्वे मार्गावरील दिवा रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवासी कामानिमित्त प्रवास करत असून, पीक अवर्समध्ये अनेक प्रवासी अक्षरशः जीव धोक्यात घालून रेल्वे रूळ ओलांडत लोकलमध्ये चढत असल्याचे चिंताजनक चित्र दिसत आहे. अलिकडेच अशाच प्रकारे लोकलमध्ये चढताना पाय घसरून एका प्रवाशाला गंभीर दुखापत झाली होती.



प्रवाशांनी रेल्वे रूळ ओलांडू नयेत यासाठी प्रशासनाने रूळाजवळ सुरक्षित जाळ्या उभारल्या आहेत. मात्र काही प्रवासी या जाळ्यांवर उभे राहून धोकादायक प्रवास करत असल्याने अपघाताचा धोका कायम आहे. या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे प्रशासनाने कठोर भूमिका घेऊन तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी डोंबिवलीतील भाजप नेते दीपेश म्हात्रे यांनी केली आहे. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांकडे ही बाब निदर्शनास आणून दिली आहे.

गेल्या वर्षी जून महिन्यात मुंब्रा-दिवा रेल्वे मार्गावर लोकलमधून पडून काही प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. त्यानंतरही दिवा स्थानकातून धोकादायक प्रवास सुरूच असल्याने प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दिवा शहरात तुलनेने कमी दरात घरे उपलब्ध असल्याने मुंबईत काम करणारा नोकरदार वर्ग मोठ्या प्रमाणात येथे वास्तव्यास आहे. त्यामुळे येथील नागरिकांची उपजीविका पूर्णतः मध्य रेल्वेवर अवलंबून आहे. मात्र वाढती लोकसंख्या, बेकायदा बांधकामे आणि वाढलेली वर्दळ यामुळे दिवा स्थानकावरील ताण दिवसेंदिवस वाढत असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी ठोस नियोजनाची गरज निर्माण झाली आहे.

# शिंदे गटाचे गणेश नाईकांच्या वर्चस्वाला थेट आव्हान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिका निवडणुकीत एकमेकांवर झालेल्या आरोप-प्रत्यारोपांनंतर वनमंत्री गणेश नाईक आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वाद मिटल्याचे म्हटले जात असताना महापौर पदावरून दोन्ही नेत्यांमधील संघर्ष पुन्हा एकदा पेटल्याचे चित्र आहे. बहुमताच्या जोरावर नवी मुंबईत भाजपचा महापौर होणार हे स्पष्ट झाले असतानाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महापौर आणि उपमहापौर पदांसाठी थेट उमेदवार रिंगणात उतरवत वनमंत्री गणेश नाईक यांच्या वर्चस्वाला आव्हान दिले आहे. नवी मुंबईत महापालिका निवडणूक स्वबळावर लढवत बहुमताचा आकडा सहज पार करून वनमंत्री गणेश नाईक यांनी आपले राजकीय वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. महापालिकेतील निर्णयप्रक्रिया, विकासकामांचे नियंत्रण आणि स्थानिक नेतृत्वावर त्यांचा प्रभाव दिसून आला. मात्र, सध्याच्या राजकीय स्थितीत शिंदे गटाने या वर्चस्वाला थेट आव्हान देण्याचा निर्धार केला आहे. नवी मुंबईत शिवसेनेचे महापौर-उपमहापौर पदांच्या निवडणुकीत केवळ प्रतीकात्मक लढत न ठेवता प्रत्यक्ष सत्ता समीकरण बदलण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

# संजय गांधी उद्यानालगतच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भाईंदर :-** काशिमीरा येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत असलेल्या मांडवीपाडा आणि काजूपाडा भागात उभारण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर अखेर महापालिकेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार येथील अनेक बांधकामे जमीनदोस्त करण्यात येत आहेत. मिरा रोड येथील काशिमीरा परिसराचा मोठा भाग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाला लागून आहे. येथे अनेक आदिवासी पाडे आहेत. वाढत्या शहरीकरणामुळे नागरी वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे शासन नियमांना डावलून अनधिकृत बांधकामे उभारणारे भूमाफिया फोफावले आहेत. परिणामी येथे खाजगी गाळे व दुकाने मोठ्या प्रमाणात उभी राहिली आहेत. प्रशासनाकडून अधूनमधून कारवाई केली जाते, मात्र ठोस उपाययोजना नसल्यामुळे अद्यापही यावर पूर्णपणे अंकुश बसलेला नाही.

# चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या घरावर गोळीबार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

मुंबई – चित्रपट दिग्दर्शक रोहित शेट्टीच्या जुहू येथील घराबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेनंतर धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. बिश्नोई गँगने सोशल मीडियाच्या माध्यमातून हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. दरम्यान, मुंबई पोलिसांना या केसमध्ये महत्त्वाचे धागेदोरे हाती लागले. पुण्यातून या प्रकरणी पाच संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे. बिश्नोई गँगने हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असली तरी पोलीस सर्व बाजूंनी या घटनेचा तपास करत आहे. मात्र बिश्नोई गँगने सार्वजनिक रित्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे, त्यामुळे तपासाचा फोकस बिश्नोई गँगवर ठेवण्यात आला आहे.

हल्ल्याच्या काही तासांनंतर लॉरेन्स बिश्नोई गँगने सोशल मीडियाद्वारे या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. सोशल मीडियावर 'अर्जू बिश्नोई' नावाच्या व्यक्तीचा ऑडिओ संदेश व्हायरल झाला आहे. यात शुभम लोणकर आणि हरी बॉक्सर यांचा उल्लेख असून, हा गोळीबार त्यांच्या सांगण्यावरून झाल्याचा दावा केला आहे.

ऑडिओ संदेशात या घटनेला केवळ 'शॉर्ट ट्रेलर' (Short Trailer) म्हटले असून, हे मोठ्या संकटाची सुरुवात असल्याचे धमकावले आहे.

रोहित शेट्टी यांनी गँगच्या कामात हस्तक्षेप करू नये, अशी चेतावणी आधी देण्यात आली होती, त्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा हल्ला झाल्याचा आरोप गँगने केला आहे.

संपूर्ण फिल्म इंडस्ट्रीला इशारा देण्यात आला आहे की, जे गँगच्या विरोधात जातील, त्यांना गंभीर परिणाम भोगावे लागतील.

### ■ पोलिसांची मोठी कारवाई (पुणे कनेक्शन):

मुंबई पोलिसांनी वेगाने तपास करत पुण्यातून ५ संशयितांना ताब्यात घेतले आहे. गुप्त माहिती आणि तांत्रिक निगराणीच्या आधारे पुण्यात छापे टाकून ही कारवाई करण्यात आली. अटक करण्यात आलेल्यांमध्ये अमन आनंद मराठे, आदित्य ज्ञानेश्वर सिंगिंग, सिद्धार्थ दीपक येनपुरे आणि समर्थ शिवशरण पोमाजी यांचा समावेश आहे. पाचव्या संशयिताचे नाव गोपनीय ठेवण्यात आले आहे. हे आरोपी बिश्नोई गँग आणि मुंबईतील स्थानिक गुन्हेगार यांच्यातील दुवा म्हणून काम करत होते. हल्ल्यानंतर हे आरोपी शहर सोडण्याच्या तयारीत होते, पण सीसीटीव्ही आणि मोबाइल लोकेशनच्या आधारे त्यांना पकडण्यात आले. रोहित शेट्टी यांच्या घराबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून त्यांची वैयक्तिक सुरक्षाही वाढवण्यात आली आहे.

# शिव समर्थ विद्यालयातील शिक्षकांचा नेशन बिल्डर अवॉर्डने पुरस्काराने गौरव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**ठाणे : प्रतिनिधी**

महानगरपालिका क्षेत्रातील कार्यरत शिक्षकांपैकी शालेय कामकाज उत्कृष्टपणे सांभाळून वेगवेगळे शैक्षणिक प्रयोगांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना रोटरी क्लब ऑफ ठाणे डाउनटाऊन यांच्या पुढाकाराने नेशन बिल्डर अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी शिव समर्थ विद्यालय, ठाणे प्राथमिक विभागातील मुख्याध्यापिका ललिता डावरे, उपशिक्षक, संजीव राठोड, उपशिक्षक देविदास सानप, आणि उपशिक्षक जगन वसावे या चौघांना दि. 31 जानेवारी 2026 रोजी सावित्रीबाई थीराणी विद्यालय, वर्तकनगर, ठाणे येथे नेशन बिल्डर अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यालयाच्या वतीने या चौघांचे खूप खूप कौतुक आणि रोटरी क्लब ऑफ ठाणे डाउनटाउन चे विशेष आभार.

# सीटीईटी व मतदान एकाच दिवशी

## जिल्हा परिषद निवडणुकीमुळे शिक्षकांची कोंडी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १**

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक वेळापत्रकात करण्यात आलेल्या बदलामुळे राज्यभरातील शिक्षकांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. सीटीईटी परीक्षा आणि मतदान एकाच दिवशी आल्याने निवडणूक कामासाठी नियुक्त शिक्षकांची परीक्षा धोक्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समितीचे मतदान दि. ७ फेब्रुवारी, तर मतमोजणी दि. ९ फेब्रुवारी रोजी जाहीर केली आहे. याच कालावधीत म्हणजे दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी शिक्षकांसाठी सक्तीची असलेली सीटीईटी परीक्षा होणार आहे. त्यामुळे दि. ७ फेब्रुवारी रोजी परीक्षा असलेल्या शिक्षकांची परीक्षा बुडण्याची शक्यता असून, दि. ८ फेब्रुवारी रोजी परीक्षा असलेल्या शिक्षकांचे केंद्र इतर जिल्ह्यात असल्यास त्यांनाही अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, सोलापूर आदी ठिकाणी सीटीईटी परीक्षा केंद्रे असून, अनेक शिक्षकांवर आधीच निवडणूक ड्युटी नेमण्यात आली आहे. न्यायालयाने सीटीईटी परीक्षा बंधनकारक केल्याने परीक्षा न दिल्यास नोकरीवर परिणाम होण्याची भीती शिक्षकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे जाहीर करण्यात आलेल्या दुखवट्यामुळे निवडणूक पुढे ढकलण्यात आली. मात्र या बदलाचा फटका शिक्षकांना बसत असल्याचे चित्र आहे. शिक्षक संघटनांनी निवडणूक कामातून शिक्षकांना वगळावे किंवा सीटीईटी परीक्षा पुढे ढकलावी, अशी मागणी केली आहे. ही परीक्षा केंद्र सरकारच्या अखत्यारित असल्याने आता यावर केंद्र सरकार काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अजित दादांच्या राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर प्रश्नचिन्ह

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**
**प्रतिनिधी / दि. १**

**मुंबई :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या शपथविधीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांना अंधारात ठेवण्यात आल्याचे शनिवारी स्पष्ट झाले. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाच्या विलीनीकरणाची चर्चा सुरू असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सुनेत्रा पवार यांच्या हाती पक्षाची धुरा सोपवण्याचा निर्णय घेतला. पटेल, तटकरेंच्या या खेळीने पवार कुटुंबातील फूट अधोरेखित झाली असून त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण अधांतरी राहण्याचे संकेत मिळत आहेत.

### ■ विलीनीकरणाबाबत तटकरेंचे कानावर हात

शरद पवार यांच्या विधानाबद्दल माध्यमाच्या प्रतिनिधींनी तटकरेंना प्रश्न केला असताना त्यांनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले. तसेच विलीनीकरणाच्या प्रश्नावरही त्यांनी बोलण्याचे टाळले. मात्र, आज समाज माध्यमात व्हायरल झालेल्या व्हिडीओवर तटकरे यांनी प्रतिक्रिया दिली. आजच्या व्हिडीओमध्ये जी बैठक दाखवली आहे ती बारामतीमधील कृषी प्रदर्शनाची आहे. ती चहापानासाठी बैठक झाली. त्यानंतर अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीबाबत चर्चा झाल्याचा स्पष्ट खुलासा अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत केला होता, असे सांगत तटकरे यांनी अप्रत्यक्षपणे विलीनीकरणाची चर्चा खोडून काढली.

### ■ एकत्र येण्याची अजितदादांची व आमचीही इच्छा - पाटील

एकत्र येण्याबाबत चर्चा करण्याची जबाबदारी अजितदादा आणि जयंत पाटील यांच्यावर होती. मात्र, अपघात झाला आणि यात खंड झाला. आमच्या पक्षात आणि त्यांच्या पक्षात एकत्र काम करण्यावर एकमत झाले होते. हा निर्णय १२ तारखेला जाहीर करायचा होता. ही तारीख अजितदादा यांनी दिली होती. दोन्ही पक्षात सकारात्मक चर्चा होती. पण अचानक ही घटना झाली. अजितदादांची इच्छा होती ती इच्छा पूर्ण व्हावी अशी सुद्धा आमची इच्छा असल्याचे पवार म्हणाले.

### ■ शपथविधीची पवारांना कल्पना न दिल्याने गूढ वाढले

नुकत्याच पार पडलेल्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक दोन्ही राष्ट्रवादीने युती करून लढवली. शिवाय सध्या सुरू असलेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत दोन्ही गटाने एकत्र येत घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नजीकच्या काळात राष्ट्रवादीच्या दोन्ही गटाचे विलीनीकरण हे जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र, अजित पवार यांच्या अकाली निधनाने राष्ट्रवादीच्या राजकारणाला कलाटणी मिळाली आहे.

अशातच सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल शरद पवारांना कोणतीही कल्पना न दिल्याने विलीनीकरणाचे गूढ वाढले आहे. विलीनीकरणाची चर्चा पुढे नेण्याआधीच राष्ट्रवादी अजित पवार गटाची जबाबदारी सुनेत्रा पवारांना दिल्याने या विलिनीकरणावर तुर्तास तरी प्रश्नचिन्हाचं सावट स्पष्ट दिसत आहे

# कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉलेज रोडवर धावत्या बर्निंग कराचा थरार

**ठाणे जीवनदीप वार्ता**
● **प्रतिनिधी / दि. १**

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉंलेज रोडवर दुर्गाडीच्या दिशेकडे जाणाऱ्या धावत्या कारने अचानक पेट घेतल्याची घटना रविवारी रात्री साडेसातच्या सुमारास घडली. यामुळे वाहतूकीचा खोळंबा झाला. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉंलेज रोडवर दुर्गाडीच्या दिशेकडे जात असणाऱ्या कारने अचनाक पेट घेतल्याची घटना रविवारी घडली. या बर्निंग कारच्या थरारात चालकाने प्रसंगावधान साधत गाडीतून बाहेर पडण्यास यशस्वी झाल्याने सुदैवाने जिवितहानी टळली. या बर्निंग कारच्या थरारामुळे वाहतूकीचा खोळंबा झाला. घटना स्थळी तातडीने केडीएमसी अग्निशमन दलाच्या बंबाने धाव घेत,अग्निशमन दलाच्या जवानांनी बर्निंग कारची आग विझवली. आणि त्यानंतर वाहनाची वाहतूक पूर्ववत सुरू झाली.या घटनेने प्रवाशांमध्ये धडकी भरली असून, यापुढे अशा प्रसंगांपासून बचावासाठी चालकांनी गाड्यांची वेळोवेळी तपासणी करणे अत्यंत गरजेचे असल्याचेही सांगितले जात आहे.

# बदलापूर : धावती लोकल पकडताना नवविवाहितेचा मृत्यू

**ठाणे जीवनदीप वार्ता**
● **प्रतिनिधी / दि. १**

**बदलापूर :** बदलापुरात लोकल पकडताना झालेल्या अपघातात चेतना चंद्रशेखर देवरुखकर (२८) या नवविवाहितेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे चेतना देवरुखकर या बदलापूर रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवरून सकाळी ८.१० ची लोकल पकडण्यासाठी आल्या होत्या. मात्र, लोकल सुटल्याने धावती लोकल पकडण्याचा प्रयत्न करताना पहिला लेडीज डबा पकडताना चेतना यांचा तोल गेला आणि त्या थेट रुळावर कोसळल्या. लोकलचा जोरदार धक्का लागल्याने त्यांचा मृत्यू झाला.

चेतना देवरुखकर बदलापूर पूर्वेतील ज्युवेली गाव परिसरातील 'जगन्नाथ गॅलेक्सी' या सोसायटीत वास्तव्यास होत्या आणि वर्षभरापूर्वीच त्यांचे लग्न झाले होते. त्या ठाण्यातील एका कंपनीत नोकरी करीत होत्या. रोजच्या बदलापूर-ठाणे प्रवासादरम्यान धावती लोकल पकडण्याच्या घाईमुळे हा मृत्यू झाला.

या दुर्दैवी घटनेने स्थानिक प्रवाशांमध्ये भीती निर्माण केली आहे. अनेकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, प्लॅटफॉर्मवरील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करावी, लोकल पकडताना प्रवाशांचे जीव धोक्यात येऊ नये यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात. दरम्यान, रेल्वे प्रशासनानेही प्लॅटफॉर्मवर उभारलेल्या जाळ्यांवर काही प्रवासी उभे राहून धोक्याचा खेळ करत असल्याचे निदर्शनास आले आहे, ज्यामुळे भविष्यात अशा प्रकारच्या अपघात टाळण्यासाठी अधिक कठोर उपाययोजना करणे आवश्यक आहे.








ठाणे ■ सोमवार
02 फेब्रुवारी 2026
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता




# ठाणे मनपाच्या माध्यमातून आज कोपरीत डीप क्लीन ड्राईव्ह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**ठाणे (०१) :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या नेतृत्वाखाली ठाणे महानगरपालिकेच्या वतीने उद्या सोमवार दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.०० वाजता नौपाडा प्रभाग समिती अंतर्गत सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. सर्वंकष स्वच्छता मोहिमेसंदर्भात आज (१फेब्रुवारी) महापालिकेत नियोजित महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे, नगरसेवक भरत चव्हाण आदी उपस्थित होते. कोपरीतील अष्टविनायक चौक येथून या सर्वंकष या स्वच्छता मोहिमेस सुरुवात होणार आहे. कोपरी गाव, कन्हैया नगर सिद्धार्थ नगर, बारा बंगला डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत रस्ते व परिसराची साफसफाई, कचरा संकलन, रस्ते पाण्याने धुणे त्याचबरोबर सार्वजनिक शौचालयांची साफसफाई व निर्जंतुकीकरण केले जाणार आहे. याशिवाय या मोहिमेदरम्यान पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण देखील करण्यात येणार आहे. या स्वच्छता मोहिमेत महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार आहेत.



# उड्डाण फेस्टीवलमध्ये पोवाडा स्पर्धेत नेने महाविद्यालय तृतीय क्रमांक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**पेण(प्रतिनिधी)**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण (जि. रायगड) येथील डी.एल.एल.ई. युनिटच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठ, मुंबई तर्फे आयोजित "उड्डाण फेस्टीवल २०२६" या भव्य उपक्रमात उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला. ही स्पर्धा उरण एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी, बोरी, उरण (जि. रायगड) येथे पार पडली.

या फेस्टीवलमध्ये महाविद्यालयातील २१ विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला होता.त्यापैकी
पथनाट्य स्पर्धा: १० विद्यार्थी,
पोस्टर स्पर्धा: ०२ विद्यार्थी
पोवाडा स्पर्धा: ०७ विद्यार्थी
क्रिएटिव्ह रायटिंग: ०१ विद्यार्थी इल्युकेशन (Elocution): ०१ विद्यार्थी

यामध्ये डॉ. देवीदास बामणे ' लिखित "जागे व्हा विद्यार्थी, जागे व्हा" या पथनाट्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी उत्तम प्रकारे केले. तसेच "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जीवनगाथा" या पोवाडा सादरीकरणात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन मुंबई विद्यापीठात तृतीय क्रमांक मिळविला.

या यशस्वी पोवाडा पथकात पाटील समिक्षा, पाटील प्राची, पाटील करीना, वाघ हेमा, पाटील साक्षी, पाटील पारस आणि पाटील हर्षल यांनी मेहनत घेऊन उल्लेखनीय कामगिरी केली. तसेच क्रिएटिव्ह रायटिंग व इल्युकेशन स्पर्धांमध्ये देखील विद्यार्थ्यांनी उत्तम सहभाग नोंदविला.या उड्डाण फेस्टीवल २०२६ मध्ये डॉ. देवीदास बामणे यांना

"उत्कृष्ट जिल्हा समन्वयक" व "उत्कृष्ट शिक्षक" या सन्मानांनी गौरविण्यात आले. हा सन्मान मुंबई विद्यापीठाच्या डी.एल.एल.ई. युनिटचे संचालक डॉ. बळीराम गायकवाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

त्या प्रसंगी प्रो. डॉ. कुणाल जाधव, प्रा. इंदुलकर, उरण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, विद्यमान सचिव, खजिनदार, प्राचार्य डॉ. गार्जे, तसेच रायगड जिल्ह्यातील विविध प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, सचिव बाळासाहेब जोशी, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू, प्राचार्य डॉ. एस. बी. धारप, प्रा. मिनल थवई, प्रा. अस्मिता पाटील, तसेच विविध विषयांचे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

डॉ. देवीदास बामणे ' यांच्या मार्गदर्शनाखाली उड्डाण फेस्टीवल २०२६ मधील सर्व स्पर्धा अत्यंत यशस्वीपणे पार पडल्या.



# आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन व पोस्टर्स स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**(बातमीदार)**

**कल्याण :** विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी 2014 पासून डावखर इन्फ्रा, रिजन्सी ग्रुप, समर्थ पेट्रोलियम, एनए सोल्युशन, डावखर फाउंडेशन, डावखर फिल्म यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान आणि इतिहास विषयावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थ्यां मधील कला गुणांना संधी देण्यासाठी त्यांच्यातल्या शास्त्रज्ञांना वाव देण्यासाठी कल्याण डोंबिवली परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतर शालेय विज्ञान प्रदर्शन 29 व 30 जानेवारी 2026 रोजी बेलग्रेव स्टेडियम, रीजन्सी अनंतम, डोंबिवली (पूर्व) येथे सकाळी 10 ते संध्याकाळी 8 या वेळेत पार पडले.

हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य होते. तसेच शाळांसाठी बसची सेवा देखील उपलब्ध करून देण्यात आली होती. यावर्षी हिस्टोरिकल कॉइन्स आणि हिस्टोरिकल स्टॅम्प पेपर चे प्रदर्शन देखील आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांना विज्ञान विषयामध्ये स्वारस्य घेण्यास प्रवृत्त करण्यासाठी विशेष आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच पोस्टर स्पर्धेचे देखील आयोजन करण्यात आले होते. जिंकणाऱ्या शिक्षकांना व विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक, पदक, प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देण्यात आले असून या वर्षी 45 शाळा सहभागी झाल्या होत्या. तर 80 प्रोजेक्ट मांडण्यात आले होते. प्रदर्शनाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदक, अभिनेता प्रणव भांबुरे यांनी केले. 5 ते 7 आणि 8 ते 10 अशा 2 गटामध्ये स्पर्धा झाली आणि 1.50 लाखाची बक्षीस विजेत्यांना मिळवली. विज्ञान प्रदर्शनासाठी एआय आधारित स्मार्ट सुरक्षा, सोलार ट्रेकिंग सिस्टम, स्मार्ट कचरा वर्गीकरण, हायड्रोजन फ्युएल सेल, स्वयंचलित रोप पाणीपुरवठा, प्लास्टिक ते इंधन संकल्पना, पायजोइलेक्ट्रिक फूड स्टेप पावर जनरेटर आणि पोस्टर्स स्पर्धेसाठी हवामान बदल, एआय व रोबोटिक्स, चंद्रयान 3 मोहीम, पाणी वाचवा जीवन जगवा, प्लास्टिक प्रदूषण जनजागृती, मानवी मेंदू, हेल्दी फूड विरुद्ध जंक फूड, विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा, सौरमंडळ असे विविध विषय देण्यात आले होते.

विज्ञान प्रदर्शनात 5 ते 7 वी गटात ओमकार इंग्लिश स्कूल आणि डॉन बॉस्को स्कूल प्रथम क्रमांक विभागून तर ओमकार केंब्रिज स्कूल यांना द्वितीय आणि गणेश विद्यालय यांना तृतीय तसेच 8 ते 10 वी गटात प्रथम क्रमांक रतनबुवा पाटील विद्यालय यांना देण्यात आला.

तर द्वितीय शंकरा विद्यालय आणि श्री चैतन्य टेक्नो स्कूल विभागून आणि तृतीय सेंट जॉन स्कूल यांना देण्यात आला. पोस्टर स्पर्धेमध्ये अनुक्रमे 5 ते 7 वी गटात गणेश विद्या मंदिर, शंकरा विद्यालय, न्यू श्री वाणी विद्यालय यांनी प्रथम द्वितीय तृतीय आणि 8 ते 10 वी गटात ओमकार इंटरनॅशनल स्कूल, बी टी गायकवाड इंग्लिश स्कूल, सेंट जॉन स्कूल यांनी प्रथम द्वितीय तृतीय क्रमांक मिळवला आहे. तर बेस्ट प्रेझेंटर म्हणून गणेश विद्यालयचा अनुज काटले आणि नूतन ज्ञान मंदिरची काव्या तुपे यांना पुरस्कार मिळाला.

# जीवनदीप गोवेली महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली येथील जीवनदीप महाविद्यालयाचा विद्यार्थी कु. धृव किनाळेकर याने क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली आहे. जीवनदीप महाविद्यालयात F.Y. BMM या वर्गात शिक्षण घेत असलेल्या धृवची निवड मुंबई विद्यापीठाच्या शूटिंग संघात झाली होती.



अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय शूटिंग स्पर्धा दिनांक २७ जानेवारी २०२६ ते ४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान शुभ भारती विद्यापीठ, हरिद्वार (दिल्ली) येथे पार पडली. या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत धृवने आपल्या मेहनत, चिकाटी व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर उत्कृष्ट कामगिरी करत पाचवे स्थान पटकावले. त्याच्या या दमदार कामगिरीची दखल घेत खेलो इंडिया युथ स्पर्धेसाठी त्याची निवड करण्यात आली असून, ही बाब महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. रविंद्र घोडवींदे, महाविद्यालयाचे संचालक श्री. प्रशांत घोडवींदे, प्राचार्य डॉ. अशोक वाघ उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे क्रीडा शिक्षक मोहनिश देशमुख तसेच संपूर्ण जीवनदीप परिवाराने धृव किनाळेकर याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# १० वर्षापासून बेपत्ता व्यक्तीला शोधण्यात पालघर पोलीसांना यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** सन २०१६ साली वाडा पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसिंग रजिस्टर क्रमांक २०/२०१६ दाखल होती. सदर मनुष्य मिसींग मधील हरवलेली व्यक्ती नामे प्रवीण गोपीनाथ पवार वय ३९ वर्षे रा. पवारवस्ती, शेवगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर हे सन २०१६ मध्ये विक्रमगड येथे हॉस्पीटलमध्ये कामानिमित्त होते. वाडा येथे असताना त्यांचे आणि त्यांचे घरच्या सदस्यांसोबत वाद झाला होता. त्याचा राग मनात धरून सदर व्यक्ती ही सन २०१६ मध्ये त्यांच्या घरच्यांना काहीएक न सांगता निघून गेले होते. सदर व्यक्तीने त्यांच्या घरच्यांशी कोणत्याही प्रकारचा संपर्क केला नव्हता. तेंव्हा घरच्यांनी दिलेल्या तक्रारीवरून वाडा पोलीस ठाणे येथे वरीलप्रमाणे मनुष्य मिसिंग दाखल केली होती. तेंव्हा त्याबाबत हरवलेल्या व्यक्तीचा शोध लागला नव्हता. पालघर पोलीस दलाकडून श्री. यतिश देशमुख, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली "ऑपरेशन मुस्कान-१४" अंतर्गत हरवलेले बालके, महिला यांचे शोध घेणेकामी विशेष मोहिम राबविली जात आहे. सदर मोहिमेअंतर्गत पालघर पोलीस दलातील दाखल असलेल्या हरवलेल्या मुले, महिला यांचे बाबत दाखल गुन्हे व मनुष्य मिसींगचा तपास नव्याने पथके नेमून करण्यात येत आहे. त्याप्रमाणे वरील हरविलेली व्यक्ती नामे प्रवीण गोपीनाथ पवार यांचेबाबत वाडा पोलीस ठाणेकडील पोउपनि/वनवे व त्यांचे पथकाने माहिती घेवून तांत्रीक तपास व गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला असता सदरची व्यक्ती ही दिल्ली येथे असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर मिसींग व्यक्तीबाबत खात्री करून सदर मिसिंग व्यक्ती ही मिळून आल्याने त्यांचे नातेवाईकांची भेट सुमारे १० वर्षांनी घालून देण्यास पालघर पोलीसांना यश आले आहे. सदरची कामगिरी ही श्री. यतिश देशमुख (पोलीस अधीक्षक पालघर), श्री. विनायक नरळे, (अपर पोलीस अधीक्षक, पालघर), श्री. समीर मेहेर (उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वाडा पोनि/ दत्तात्रेय किंद्रे, प्रभारी अधिकारी वाडा पोलीस ठाणे, पोउपनि/वनवे, तसेच वाडा पोलीस ठाणेचे पोलीस पथकाने उत्कृष्टरित्या केली आहे. बाबत नागरिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# टीडब्ल्यूजे कंपनीकडून गुंतवणूकदारांची फसवणूक - तिघांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता ■ प्रतिनिधी

**ठाणे :** टीडब्ल्यूजे या कंपनीच्या माध्यमातून गुंतवणूकदारांना बेकायदेशीर योजनांमध्ये अशक्यप्राय परताव्याचे आमिष दाखवून सुमारे १२०० कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे यांनी मोठी कारवाई करत तीन आरोपींना गुजरातमधून अटक केली आहे. ९ फेब्रुवारी २०२४ ते १८ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत टीडब्ल्यूजे या कंपनीचे संस्थापक व संचालक समीर नार्वेकर, अमित बालम तसेच कंपनीशी संबंधित व्यवस्थापकांनी ठाणेसह संपूर्ण राज्यातील १६ जिल्ह्यांमध्ये टीडब्ल्यूजे नावाने विविध कंपन्या उघडून सदर कंपन्यामध्ये सुमारे ११,००० गुंतवणूकदारांना बेकायदेशीर योजनांमध्ये अशक्यप्राय परताव्याचे आमीष दाखवून सुमारे १२०० कोटी रुपयांचा अपहार केलेबाबतची तक्रार आर्थिक गुन्हे शाखेकडे प्राप्त झाली होती.

# केडीएमसी क्षेत्रात पसरलेल्या धुळीवर उपायोजनांची गरज

## सहयोग सामाजिक संस्थेची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
(प्रतिनिधी)

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात धुळीचे साम्राज्य पसरले असून या धुळीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. धुळीमुळे अनेक आजार उद्भवत असून पसरलेल्या या धुळीबाबत उपायोजना करण्याची मागणी सहयोग सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विजय भोसले यांनी केडीएमसी आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण डोंबिवली शहरात कुठेही जा संपूर्ण शहर हे धुळीने माखले आहे, एकही रस्ता असा नाही जिथे धूळ नाही, रस्त्याजवळच्या गाड्या, इमारती, झाडे हे पण धुळीने भरले आहेत. लोकांना श्वास घ्यायला त्रास होत आहे, श्वसन संस्थेच्या, घशाच्या विकाराने अनेक लोक आजारी पडले आहेत. रस्त्याजवळ ऊभी असणारी गाडी एका दिवसात संपूर्ण धुळीने भरली जाते, तर त्याच रस्त्यावरून माणूस जाताना त्याच्या नाका तोंडावाटे किती धूळ त्याच्या शरीरात जात असेल याची कल्पना न केलेली बरी. झाडांचा सुद्धा श्वास कोंडला आहे, जी झाडे हिरवीगार दिसायला पाहिजे, ती धुळीने भरलेली दिसतात.

कल्याण डोंबिवली महापालिकेचे आयुक्त हे उच्च शिक्षित आहेत, तसेच ते धडाडीने काम करणारे अधिकारी आहेत. घन कचरा विभागाचे उपायुक्त रामदास कोकरे यांना त्याच विभागासाठी राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर अनेक पारितोषिक प्राप्त झाले आहेत. राज्याचे नेतृत्व करणारे कल्याण डोंबिवली महापालिकेचे सुद्धा नेतृत्व करत आहेत, असे असताना सुद्धा हे शहर धुळीने व घाणीने का भरले आहे असा सवाल भोसले यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे लवकरात लवकर शहरात जी धूळ पसरलेली त्याबाबत उपाययोजना करावी, व नागरिकांना त्या पासून होणाऱ्या आजारापासून वाचवावे अशी मागणी सहयोग सामाजिक संस्थेने केली आहे.

शहरात पसरलेली धूळ कमी करण्यासाठी मलनिस्सारण प्रकल्पातून प्रक्रिया केलेले चांगले पाणी रस्ता धुण्यासाठी वापरू शकतो, तसेच शहरात मोठ्या प्रमाणात विकास कामे होत असल्यामुळे खडी, वाळू,सिमेंट, आरएमसी वाहून नेणारे ट्रक हे आपल्यासोबत मोठ्या प्रमाणात धूळ शहरात आणतात, त्यामुळे त्यांच्या गाड्यांची व चाकाची कडक तपासणी व्हावी अशा सूचना देखील सहयोग सामाजिक संस्थेच्या वतीने केडीएमसी आयुक्तांना करण्यात आल्या आहेत.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रमात पारिवली जि. प. शाळा अव्वल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या राज्यस्तरीय उपक्रमात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारिवली हिने उत्कृष्ट कामगिरी करत भिवंडी तालुक्यात अव्वल स्थान मिळविले आहे. या यशामुळे पारिवली गावासह संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे.



या उपक्रमांतर्गत शाळेच्या इमारतीचे सौंदर्यीकरण, स्वच्छ व सुरक्षित वर्गखोल्या, आकर्षक भिंतलेखन, शैक्षणिक साहित्याची मांडणी, ग्रंथालय व्यवस्था, स्वच्छतागृहांची सुधारणा, वृक्षारोपण तसेच विद्यार्थ्यांच्या सहभागातून राबविण्यात आलेले विविध उपक्रम प्रभावीपणे पूर्ण करण्यात आले. शाळेचा परिसर स्वच्छ, सुंदर व विद्यार्थ्यांसाठी आनंददायी बनविण्यात आला आहे.

या यशामागे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी संजय असवले, विस्तार अधिकारी वैशाली डोंगरे यांचे मार्गदर्शन शाळेतील मुख्याध्यापक पांडुरंग भोईर, शिक्षकवृंद सुरेश पांगारे, वंदना कोळी व अश्विनी पुरी व विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गोरखनाथ लसणे, माजी विद्यार्थी संघांचे अध्यक्ष प्रकाश लसणे मित्र परिवारचे ही मार्गदर्शन लाभले. पालक आणि ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून जिल्हा परिषद शाळा देखील गुणवत्तापूर्ण व आदर्श ठरू शकते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जि. प. शाळा पारिवली येथील संपूर्ण शालेय परिवाराचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# ग्रामपंचायत सदस्या आश्वीनी कशिवले यांच्या प्रयत्नाने समतानगरमध्ये भरघोस विकासकामे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**प्रतिनिधी / पडघा**

भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीच्या महीला सदस्या आश्वीनी कशीवले यांनी पाच वर्षांत समतानगर मध्ये केलेल्या भरघोस विकास कांमामुळे समतानगरचा अल्पावधीतच कायापालट झाला आहे.



बोरीवली ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत सन २०२१ साली वार्ड क्रमांक २ मधुन आश्वीनी अशोक कशीवले या सदस्य म्हणून निवडुन आल्या.निवडुन आल्यानंतर त्यांनी स्वस्त न बसता सन २०२१-२५ या कालावधीत समता नगर येथे माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या आशीर्वादाने ठाणे जिल्हा परिषद फंडातुन २३ लाख ६४ हजार निधी मंजूर करून जिल्हा परिषद मराठी शाळेच्या नवीन इमारतीचे व ५ लाख निधीतून विद्यार्थ्यांसाठी शाळा स्वच्छतागृहाचे बांधकाम केले. तसेच ५ लाख आमदार फंडातुन पाईप लाईन तर ५ लाख ग्रामपंचायत निधीतून बोअरवेल, ५ लाख रुपये निधीतून विद्यार्थ्यांसाठी ई लायब्ररी, ५ लाख रुपये निधीतून गटार बंदीस्त करण्यासाठी झाकणे, ५ लाख निधीतून भुयारी गटार, ५ लाख निधीतून समाज हॉल दुरूस्ती, संपुर्ण समतानगरमध्ये रस्त्यावर पथदिवे, स्मशानभूमी नुतनीकरणासाठी ६ लाख रुपयांचा निधी मंजूर, नागरीकांना घरकूले मंजुर करून दिले अशी भरघोस विकासकामे करून नागरीकांना बसण्यासाठी १०० खुर्च्या, ८ बाकडे मंजुर केले,त्यामुळे समतानगरचा विकासात्मक कायापालट झाला असून जलजिवन मिशन अंतर्गत बोरीवली येथे ८ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजनेच्या मंजूरीसाठी कशीवले यांनी विशेष प्रयत्न केले तर ५० ते ६० वर्षापासून रखडलेल्या समतानगर रस्त्यासाठी त्यांना अडचणींचा सामना करून प्रस्थापितांविरोधात मोठा संघर्ष करावा लागला होता. मात्र कुठल्याही परिस्थितीत न डगमगता त्यांनी रस्त्याचे काम पुर्ण केले. त्यामुळे सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.तसेच समतानगर मध्ये विकासकामे व्हावीत यासाठी त्यांना वेळोवेळी रस्त्यावर उतरून संघर्ष करावा लागला.ही सर्व विकासकामे करण्यासाठी त्यांना वेळोवेळी बोरीवली ग्रामपंचायतीचे सरपंच अन्वर पिंजारी ग्रामपंचायत अधीकारी गणेश जाधव व माजी सरपंच सोहराब गुजर सामाजिक कार्यकर्ते अशोक कशीवले, अजय कशीवले यांचे मोलाचे सहकार्य लाभले.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024